

# चिनाबच्या खोऱ्यातील पाणसुरुंग

'द आर्म्स रेस इन द इंडो-पाकिस्तान सबकॉन्टिनेन्ट, कॉन्फ्लिक्टस् वुइथ द प्रेसिंग रिक्वायरमेंटस् ऑफ सोशो-इकॉनॉमिक डेव्हलपमेंट. व्हॉट आर इटस् कॉजेस ॲण्ड इम्प्लिकेशन्स? इज देअर अ रेमेडी?'

- लंडनच्या 'रॉयल कॉलेज ऑफ डिफेन्स स्टडीज'मधील एक वर्षाच्या प्रशिक्षण अभ्यासक्रमात पाकिस्तानच्या एका चुणचुणीत, महत्त्वाकांक्षी, ब्रिगेडियरच्या हुद्यावरील लष्करी अधिकाऱ्याने अशा लांबचलक नावाचा निबंध सादर केला. ते साल होते १९९०. या निबंधाचं 'नाव मोठं' असलं तरी 'लक्षण खोटं' नव्हतं! दक्षिण आशियातील संभाव्य संघर्षांची नवी परिमाणे या निबंधात मांडली होती. हिंदू आणि मुस्लिम मनोवृत्तींमधील तफावत आणि जम्मू-काश्मीरचा वादग्रस्त भूप्रदेश या दोन प्रश्नांचा आढावा त्यात होताच; पण तिसरा त्या उमेदवाराच्या लेखी अधिक मोलाचा होता. तो म्हणजे, भारत आणि पाकिस्तान यांच्यामधील पाणीवाटप आणि वापराचा! उभय देशांमधील संघर्षाची बीजे याच सिंधू आणि इतर नद्यांच्या पाण्यात आहेत, असा निष्कर्ष त्याने मांडला होता.

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संघर्षाचा कळीचा प्रश्न 'काश्मीर' हा आहे, असे पाकिस्तानचे राज्यकर्ते गेली पन्नास वर्षे म्हणत आले आहेत. मुस्लिम बहुसंख्याक असलेले काश्मीर भारतात सामील करणारा, तत्कालीन राजे हरीसिंह यांचा करारनामा धुडकावून पाकिस्तानी टोळ्या १९४८ मध्ये उत्तर आणि वायव्येकडून काश्मीरमध्ये घुसल्या. तेव्हाची युद्धबंदी रेषा, नंतरची ताबारेषा, १९६५, १९७१ ची युद्धे आणि कारगिलची घुसखोरी यानंतर बदलत गेलेली प्रत्यक्ष नियंत्रण रेषा ही उभयतांमधील संघर्षाची धगधगती रेषा मानली गेली. सीमेपलीकडील दहशतवाद, अतिरेकी प्रशिक्षण छावण्या, मानवी हक्कांची पायमल्ली, सामीलनाम्याची वैधता, निवडणुकांमुळे सिद्ध झालेली सार्वमताची निरर्थकता अशा मुद्यांवर दोन्ही देशांच्या राज्यकर्त्यांमध्ये वारंवार वाद होत राहिले. भारतातून पाकिस्तानात वाहत जाणाऱ्या व्यास, सतलज, रावी, चिनाब, झेलम आणि सिंधू नद्यांच्या पाण्यातच भावी संघर्षाचे सुरुंग पेरलेले असल्याचे या अधिकाऱ्याचे प्रतिपादन मात्र आपल्या पूर्वसुरींपेक्षा वेगळे होते.

पुढे आठ वर्षांत एकएक पायऱ्या चढत जनरल जहांगीर करामत यांच्या जागी पाकिस्तानचे लष्करप्रमुख या पदावर त्याची नियुक्ती झाली आणि नवाज शरीफ यांची पंतप्रधानपदावरून उचलबांगडी करून सत्तेची सर्व सूत्रे या 'द्रष्ट्या' नेत्याकडे आली, तेव्हा आपला अजेंडा अमलात आणण्याचा त्याचा मार्ग खुला झाला.

हेच ते परवेझ मुशर्रफ, ज्यांनी लंडनमध्ये 'पाण्यातील सुरुंगां'चे भाकीत केले होते. हेच ते मुशर्रफ, ज्यांनी १९९९ मध्ये 'चिनाब फॉर्म्युला' मांडून खळबळ उडवून दिली होती.

सिंधू नदीस मिळणाऱ्या पाच नद्यांपैकी चिनाब ही एक महत्त्वाची नदी. फाळणीनंतर पाणीवाटपाबाबत वाद होऊ लागले तेव्हा भारत आणि पाकिस्तान यांनी 'सिंधू पाणी लवाद' नेमून १९ सप्टेंबर १९६० पासून तो अमलात आणला. त्यानुसार व्यास, सतलज आणि रावी या पूर्वेकडील नद्यांच्या पाण्यावर भारताचा तर चिनाब, झेलम आणि सिंधू नद्यांच्या पाण्यावर पाकिस्तानचा हक्क प्रस्थापित झाला. व्यास, सतलज, रावी नद्यांवर धरणे, वीज प्रकल्प बांधून, त्यांचे पाणी वळवून, कालव्यांचे जाळे विणून पंजाब-हरियाणाबरोबर राजस्थानचाही विकास नंतरच्या काळात आपण घडवून आणला. या तिन्ही नद्यांचे पाणी पूर्णपणे भारतीय भूप्रदेशातच

**प्रत्यक्ष नियंत्रण रेषेऐवजी चिनाब नदी हीच भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सीमारेषा म्हणून निश्चित करण्यात यावी आणि उभय देशांमधील संघर्ष कायमस्वरूपी मिटविण्यात यावा; किंबहुना हाच एकमेव तोडगा आपण मान्य करू, असे मुशर्रफ यांनी १९९९ मध्ये म्हटले होते. हाच तो त्यांचा एका दगडात दोन पक्षी मारणारा 'चिनाब फॉर्म्युला.' वास्तविक मुशर्रफ यांना काश्मीरच्या नंदनवनापेक्षाही चिनाब नदीचे पाणीच अधिक हवेसे आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यात आणखी एक युद्ध भडकलेच तर ते काश्मीरसाठी नव्हे, तर काश्मीरमध्ये अडकलेल्या पाण्यासाठी असेल!**



जिरवण्याचा हक्क आपणास मिळाला; पण चिनाब, झेलम आणि सिंधू नद्यांचे पाणी मात्र पूर्णपणे पाकिस्तानच्या वाट्यास गेले. सिंधू पाणी करारानुसार चिनाब, झेलम आणि सिंधू नद्यांच्या खोऱ्यातील एक लाख एकवीस हजार हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येईल एवढेच पाणी आपण अडवू शकतो आणि त्यावर वीजनिर्मितीही करू शकतो. मात्र किमान गरजेच्या या मर्यादेपेक्षा अधिक पाणी आपण अडवू शकत नाही. वीजनिर्मितीसाठी धरण बांधले तरी त्यातील पाणी मात्र पाकिस्तान किंवा पाकिस्तानव्याप्त काश्मीरमधील नागरिकांच्या वापरासाठी पात्रात सोडून द्यावे लागते. सिंधू आणि झेलम नद्या उत्तरेकडून व्याप्त काश्मीरमध्ये उतरतात. त्यांच्या पाण्याबाबत फारसा मतभेदाचा प्रसंग कधी आला नाही. पण प्रचंड खळाळ असलेली, वीजनिर्मितीसाठी नऊ मोठी धरणे (भारतीय हद्दीत) बांधता येऊ शकतील अशी चिनाब नदी गेल्या दहा-पंधरा वर्षांत वादाचा मुद्दा होऊ लागली आहे. तिच्यावरील बागलिहार जलविद्युत प्रकल्पास हरकत घेऊन पाकिस्तान हा प्रश्न आंतरराष्ट्रीय पातळीवर नेत आहे. या वादाचे पैलू हा स्वतंत्र लेखाचा विषय आहे, पण चिनाब नदीवरील कोणत्याही प्रकल्पास पाकिस्तान असा आक्षेप घेणार; कारण सिंध


आणि बलुचिस्तानातील असंतोषासह अनेक अंतर्गत प्रश्नांवर भारताकडे बोट दाखवून आपली मान सोडवून घेण्याचा तो राजकीय उपाय आहे.

वाढती लोकसंख्या आणि अपुरे स्रोत, उद्योगांची वाढती गरज आणि विषम वाटप, तसेच बदलते पर्यावरण आणि घटत गेलेली भूअंतर्गत पाण्याची पातळी अशी इतरही अनेक कारणे आहेत; पण पाकिस्तानात पाण्याची कमतरता गेल्या काही वर्षांत वाढत गेली, हे खरे आहे. सिंधू पाणीवाटप करारापूर्वी किंबहुना फाळणीनंतरच्या सुरुवातीच्या काळात पाकिस्तानात दरडोई उपलब्ध असलेले पाण्याचे प्रमाण पाच हजार सहाशे चौरस मीटर एवढे होते. गेल्या वर्षापर्यंत ते बाराशे चौरस मीटरपर्यंत घसरले आहे आणि पुढील चार-दोन वर्षांत ते एक हजार चौरस मीटरपेक्षाही खाली जाईल, असा अंदाज आहे.

पाकिस्तानातील ऐंशी टक्के शेती कालव्याच्या भिजक्षेत्रात येते. जगातील सर्वांत मोठे कालव्यांचे जाळे पाकिस्तानात आहे. सिंधू नदीच्या खोऱ्यातील धरणांमुळेच सुमारे साठ टक्के जमीन ओलिताखाली येऊ शकते. अशा स्थितीत सिंधू, झेलम आणि चिनाब या नद्यांमधून वाहत




येणाऱ्या पाण्याचे प्रमाण निसर्गचक्रानुसारच गेल्या काही वर्षांत कमी झालेले आहे. हिमालयातून या नद्यांमध्ये येणारे पाणी दरवर्षी सुमारे साडेसहा टक्क्यांनी कमी होत आहे. भारताच्या हद्दीत बांधले जाणारे वीजनिर्मिती प्रकल्प आणि ही नैसर्गिक घट यांचा बादरायण संबंध पाकिस्तानही जोडू शकत नाही. पण दिवसेंदिवस कालव्याच्या पाण्याची मागणी आणि गरज वाढतच असताना प्रत्यक्षात पाणी कमी उपलब्ध होऊ लागल्यामुळे पाकिस्तानातील शेतकरी अस्वस्थ होऊ लागले. तसेच पाण्यावर अवलंबून असणाऱ्या उद्योगांनाही झळ पोहोचू लागली. अर्थात सामान्य माणसालाही पाणीटंचाई भेडसावू लागली. यातच जास्तीत जास्त पाणी आपल्या जमिनीकडे वळविण्याचे श्रीमंत पंजाबी शेतकऱ्यांचे उद्‌व्याप, त्यातून होणारे विषम पाणीवाटप, सिंध आणि बलुचिस्तानातील वाढती पाणीटंचाई, तेथील उद्योगांचे स्थलांतर, त्यामुळे घटणारा रोजगार, त्यातून वाढू लागलेला असंतोष आणि फुटीर चळवळी असे दुष्टचक्रच पाकिस्तानात निर्माण झाले. यावर उपाय म्हणजे भारताच्या वाट्याला आलेले पाणीही साम-दामादी मार्गांनी आपल्याकडे वळविण्याचा प्रयत्न



करणे आणि चिनाब नदीचे पाणी वीज प्रकल्पासाठीदेखील वापरू न देणे. बागलिहार प्रकल्पास वारंवार आक्षेप घेण्यामागे ही कारणमीमांसा आहे, तसा 'चिनाब फॉर्म्युला'च्या राजकीय डावपेचाचा कंगोराही आहे.

सिंधू आणि झेलमचे बहुतांश पाणी- त्या दोन्ही नद्या पाकिस्तानातून दूरवर वाहत असल्यामुळे- पाकिस्तान वापरू शकते. पण चिनाब करारानुसार पाकिस्तानच्या वाट्याला येऊनही तिचा फायदा मात्र पुरेसा घेता येत नाही. भारताने वीज प्रकल्पासाठी चिनाबवर धरणे बांधली तरी त्या पाण्याचा वापर भारत जलसिंचनासाठी, शेतीसाठी, उद्योगासाठी अथवा इतर कारणांसाठी करीत नाही. अर्थात हे पाणी पुन्हा पात्रातच सोडून द्यावयाचे असल्याने वीज प्रकल्पाच्या गरजेपेक्षा मोठी धरणे बांधण्याचे भारतास कारणच नसते. या उलट ही नदी पाकिस्तानच्याच हद्दीत अधिकृतपणे आली तर तिच्यावर हवी तेवढी, हव्या तेवढ्या उंचीची धरणे बांधून पाकिस्तान पाण्याचा साठा वाढवू शकतो आणि पंजाबमध्ये अनेकदा पुरामुळे होणारे नुकसान तसेच पाणी वाया जाण्याचे प्रमाणही रोखू शकतो.

राजस्थानच्या वाळवंटास 'हिरवा रंग' आणण्यासाठी यमुना आणि सतलज नद्या जोडण्यासारखा महत्त्वाकांक्षी प्रकल्प भारताने अंमलात आणला. तसाच चिनाबचे पाणी वळविण्याची योजनाही भारत राबवू शकला असता. पण सिंधू पाणी लवादामुळे असे काही आपण करू शकत नाही. त्याचबरोबर पुराचे संकट आपल्या भूप्रदेशात ओढवत नसल्याने पूरनियंत्रणासाठी म्हणून चिनाबवर मोठे बंधारे घालण्याची गरजही भारतास पडत नाही. भारत-पाकिस्तान प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढण्याच्या निमित्ताने चिनाब नदीच्या खोऱ्यावरच नियंत्रण मिळवता आले तर? याच हेतूने मुशर्रफ यांनी 'चिनाब फॉर्म्युला' सुचविला होता!

भौगोलिकदृष्ट्या चिनाब नदी जम्मू आणि काश्मीरचे दक्षिण-उत्तर विभाजन करते. प्रत्यक्ष नियंत्रणरेषेच्या कितीतरी अलीकडे, श्रीनगरच्या दक्षिणेस किश्तवाडपासून अखनूरपर्यंत ती पूर्व-पश्चिम दिशेने वाहत जाते. काश्मीरचे बहुतांश खोरे तिच्या उत्तरेस आहे. हिंदू बहुसंख्याक असलेले जम्मू तसेच लडाखही राहो, पण मुस्लिम बहुसंख्याक काश्मीरवर आपला हक्क असल्याचा दावा पाकिस्तान करतो.

प्रत्यक्ष नियंत्रण रेषेऐवजी चिनाब नदी हीच भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सीमारेषा म्हणून निश्चित करण्यात यावी आणि उभय देशांमधील संघर्ष कायमस्वरूपी मिटविण्यात यावा; किंबहुना हाच एकमेव तोडगा आपण मान्य करू, असे मुशर्रफ यांनी १९९९ मध्ये म्हटले होते. हाच तो त्यांचा एका दगडात दोन पक्षी मारणारा 'चिनाब फॉर्म्युला.' वास्तविक मुशर्रफ यांना काश्मीरच्या नंदनवनापेक्षाही चिनाब नदीचे पाणीच अधिक हवेसे आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यात आणखी एक युद्ध भडकलेच तर ते काश्मीरसाठी नव्हे, तर काश्मीरमध्ये अडकलेल्या पाण्यासाठी असेल!

चिनाब नदी, तिच्या खोऱ्यातील उपनद्या आणि त्यांचे पाणी यावर संपूर्ण नियंत्रण मिळवता आले, तर पाकिस्तानची डोकेदुखी संपून जाईल. सिंधू पाणी लवाद एकतर्फी रद्दबातल ठरविता येत नाही आणि तसे घोषित करणे पाकिस्तानच्या हिताचेही नाही. म्हणून काश्मीर प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढण्याच्या निमित्ताने चिनाबचे खोरे आपल्या नियंत्रणाखाली आणावे, असा मुशर्रफ यांचा हेतू आहे. तो ओळखून राजकीय अक्कलहुशारीने मुशर्रफ यांना 'पाणी पाजले' तर काश्मीर प्रश्नाची धार बोथट होऊ शकते. चिनाबच्या खोऱ्यात पेरले गेलेले हे 'सुरुंग' सावधपणानेच काढावे लागतील.

'इंटरनॅशनल सेंटर फॉर पीस इनिशिएटिव्ह' संस्थेने आखलेले 'द फायनल सेटलमेंट' या दृष्टीने दुहेरी फायदेशीर आहे.

■ आल्हाद गोडबोले